# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर

**अपिल क्रमांक १८/२०१२**

**सुनावणी दिनांक १६/३/२०१२**

श्री दि.को.खेडकर,
१०२, सदानंद अपार्टमेंट,
गोखलेनगर रोड, पुणे-१६

अपिल करणार

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
मुंबई

प्रतिवादी

## <u>आदेश</u>

अपिल करणार यांनी जन माहिती अधिकारी, मप्रनि मंडळ यांच्याकडे प्रादेशिक अधिकारी संवर्गाची तयार केलेली बिंदुनामावली, महाराष्ट्र शासनास सादर केली, त्याबाबत दिनांक १५/१/२०१२ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेली होती. सदरहू अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक १९/१/२०१२ रोजी प्राप्त झाल्यानंतर, त्याच दिवशी त्यांनी लेखा अधिकारी (आस्थापना), मप्रनि मंडळ यांच्याकडे पुढील योग्य ती माहिती प्राप्त करुन देण्याकरिता पाठविलेला होता. सदरहू पत्राप्रमाणे दिनांक १८/२/२०१२ रोजी लेखा अधिकारी (आस्थापना) यांनी जन माहिती अधिकारी यांना खालीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आढळते.

**मुद्दा क्र.१** - मप्रनि मंडळाने प्रादेशिक अधिकारी संवर्गाबाबत महाराष्ट्र शासनास सादर केलेली बिंदू नामावली :

प्रादेशिक अधिकारी संवर्गाच्या मप्रनि मंडळाने तयार करुन महाराष्ट्र शासनास सादर केलेल्या बिंदू नामावलीची छायांकित प्रत, मूळ प्रत शासनाकडे सादर केल्यामुळे, शासन मंजूरीनंतरच उपलब्ध करुन देता येईल तसेच आस्थापना शाखेकडे अशा प्रकारची छायांकित प्रत ठेवण्यात आलेली नाही.

Recd copy
16/3

**मुद्दा क्र.२** : मप्रनि मंडळाचा प्रादेशिक अधिकारी पदाच्या बिंदूनामावलीबाबत महाराष्ट्र शासनाशी किंवा शासनाचा मप्रनि मंडळाशी झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती.

आस्थापना शाखेने सदरहू पत्राबरोबर मप्रनि मंडळाचा संबंधीत बिंदूनामावलीबाबत शासनाशी किंवा शासनाकडून मंडळाशी झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. अपिल करणार यांना जन माहिती अधिकारी यांनी सदरहू माहिती दिनांक २२/२/२०१२ च्या पत्राद्वारे पाठविली होती. अपिल करणार यांना सदरहू माहिती दिनांक २७/२/२०१२ रोजी प्राप्त झाली, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच सदरहू माहितीमध्ये प्रादेशिक अधिकारी पदाच्या दिनांक २/८/२००४ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमधील पदोन्नतीच्या वेळी वापरण्यात आलेली सेवाजेष्ठता यादी सोबत जोडली आहे, असे सदस्य सचिव, मप्रनि मंडळ यांनी उप-सचिव (तां.क.) यांना पाठविलेल्या दिनांक ६/९/२०११ च्या पत्रातील जोडपत्र प्राप्त न झाल्याचे अपिल करणार यांनी सुनावणीच्या वेळी निदर्शनास आणून दिले.

त्याबाबत लेखा आधिकारी(आस्थापना) यांनी सदरहू जोडपत्र ताबडतोब उपलब्ध करुन देत असल्याचे स्पष्ट केले.

**मुद्दा क्र.३** : प्रादेशिक अधिकारी संवर्गाची बिंदूनामावली मागासवर्ग कक्ष, महाराष्ट्र शासन यांनी मंजूर केली असल्यास त्याच्या प्रती, नसल्यास त्याची कारणे.

आस्थापना शाखेने दिनांक १८/२/२०१२ रोजीचे उत्तर देतेवेळी सदरहू उत्तरामध्ये, सदरहू प्रकरण अद्यापी पर्यावरण विभागाकडे प्रलंबित आहे असे स्पष्ट करण्यात आलेले होते., त्यानंतर कक्ष अधिकारी, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ५/३/२०१२ च्या पत्राद्वारे सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने प्रादेशिक अधिकारी व उप-प्रादेशिक अधिकारी या संवर्गाच्या पदोन्नतीच्या बिंदू नामावल्याबाबत कळविलेले होते की, सदरहू पत्र प्राप्त झाल्यानंतर आस्थापना शाखेने दोन्ही पदांच्या बिंदूनामावली नोंदवहीमध्ये सामान्य प्रशासन विभागातील सक्षम प्राधिका-याची मान्यता दिल्याची नोंद नसल्यामुळे, कक्ष अधिकारी यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार, सदरहू नोंदवह्या पुन्हा: पर्यावरण विभागाकडे दिनांक १३/३/२०१२ च्या पत्राद्वारे पाठवून दिल्या. सदरहू दोन्ही पत्राच्या प्रती आज रोजी अपिल करणार यांना सुनावणीच्या वेळी उपलब्ध करुन दिल्या.

**मुद्दा क्र.४** : ज्या तारखेस बिंदूनामावलीबाबत माहिती उपलब्ध झाली, त्या तारखेबाबत तपशील.

सदरहू मुद्याबाबत आस्थापना शाखेने असे स्पष्ट केले की, सदरहू माहिती आजच्या तारखेपर्यंत उपलब्ध आहे तशी उपलब्ध करुन दिलेली आहे. बिंदूनामावली शासनाकडून प्राप्त झाल्यानंतर अपिल करणार यांनी विनंती केल्यामुळे, बिंदूनामावलीची प्रत ३ दिवसांत उपलब्ध करुन देण्यात येईल.

**मुद्दा क्र.५** : छायांकित प्रती साक्षांकित करुन टपालाद्वारे पाठविणेबाबत

आस्थापना शाखेने संबंधीत प्रती साक्षांकित करुन दिली असल्याचे आणि जन माहिती अधिकारी यांनी सदरहू माहिती टपालाद्वारे पाठविली असल्याचे आणि अपिल करणार यांना मिळाली असल्याचे स्पष्ट होत असल्यामुळे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक १६/३/२०१२ रोजी मुंबई येथून.

( द. त्रि. देवळे )
अपिलीय अधिकारी